CIDCO
WE MAKE CITIES

NEWS

रायगड टाइम्स बुधवार, २१ ऑगस्ट २०२४

# खारघर-सीबीडी कोस्टल रोडला ग्रीन सिग्नल

## ८ वर्षांपासून रखडलेला प्रश्न मार्गी, वाहतूक कोंडीतून होणार सुटका

। रायगड टाइम्स ।

पनवेल । खारघर ते सीबीडी ३० मीटर रुंदीच्या कोस्टल रोड उभारणीला भारत सरकारच्या 'पर्यावरण, वन आणि हवामान बदल मंत्रालय'ने परवानगी दिल्यामुळे ८ वर्षांपासून रखडलेल्या खारघर ते सीबीडी खाडीकिनारा कोस्टल रोडचा प्रश्न मार्गी लागणार आहे. त्यामुळे प्रवाशांची वाहतूक कोंडीतून सुटका होणार असून कळंबोली, कामोठे आणि खारघरवासियांना नवी मुंबई विमानतळ गाठणे आता सोयीचे होणार आहे.

'सिडको'ने नवी मुंबई प्रकल्प उभारण्याचा संकल्प हाती घेताना तळोजा, कळंबोली आणि खारघरवासियांना नवी मुंबई विमानतळ विना अडथळा जाता यावे यासाठी 'सिडको'ने खारघर ते सीबीडी खाडीकिनारा ६.९६ किलोमीटर लांबीच्या कोस्टल रोडसाठी २०१८ साली निविदा काढली काढून २७३ कोटीचे कंत्राट एका कंपनीला देण्यात आले होते. मात्र, सदर प्रकल्पाला पर्यावरण विभागाकडून परवानगीसाठी 'सिडको'कडून प्रयत्न सुरु होते. मात्र, त्याला यश मिळत नव्हते. अखेर ऑगस्ट महिन्याच्या पहिल्या आठवड्यात केंद्र सरकारच्या 'पर्यावरण, वन आणि हवामान बदल मंत्रालय'च्या 'तज्ञ मूल्यांकन समिती'ने कोस्टल रेग्युलेशन झोननुसार खारघर ते सीबीडी-बेलापूर, सेक्टर-१५ दरम्यान उभारल्या



जाणार्‍या कोस्टल रोडच्या बांधकामाला परवानगी दिली दिल्यामुळे खारघर ते सीबीडी दरम्यान होणाऱ्या वाहतूक कोंडीतून प्रवाशांची सुटका होणार आहे.

पुणे-मुंबईकडे जाणाऱ्या नागरिकांना नवी मुंबई पामबीच आणि कोस्टल रोडने थेट खारघर टोल नाक्यापर्यंत विना अडथळा येता येणार आहे. खारघर ते सीबीडी सेक्टर-१५ खाडीकिनारा अंदाजे ६.९६ किलोमीटर अंतराचा कोस्टल रोड आहे. तळोजा-खारघर मधील नागरिकांना सीबीडी, सेक्टर-११ मार्गे नवी मुंबई विमानतळावर विना अडथळा जाता येणार आहे. खारघर-सीबीडी दरम्यान होणारी वाहतूक कोंडी सुटण्यास मदत होणार आहे. कोस्टल रोडमुळे खारघर कार्पोरेट पार्क, फुटबॉल स्टेडियमचा प्रवास सुखाचा होणार आहे. खारघर टोल नाकादरम्यान सायन-पनवेल महामार्गावर पूल उभारून रस्ता केला जाणार असल्यामुळे भविष्यात खारघर सेक्टर-१५, १६ ते १८ येथील घरांना अधिक मागणी असणार आहे.

धावते नवनगर बुधवार, २१ ऑगस्ट २०२४

# सिडकोच्या अभय योजनेस 15 सप्टेंबरपर्यंत मुदतवाढ

■ नवी मुंबई, प्रतिनिधी




नवी मुंबईतील सिडकोच्या भूखंडांवर बांधकाम मुदतवाढीकरिता देय असलेल्या अतिरिक्त भाडेपट्टा शुल्क वसुलीबाबत राबविण्यात आलेल्या अभय योजनेस महाराष्ट्र शासनाच्या निर्णयानुसार 15 सप्टेंबर 2024 पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. नवी मुंबई व परिसरातील सिडकोने भाडेपट्ट्याने वितरीत केलेल्या जमिनींच्या विकासनाच्या अनुषंगाने बांधकाम व्यवसायाशी संबंधित अडचणी लक्षात घेता महाराष्ट्र शासनाने 12 जानेवारी 2024 रोजीच्या आदेशान्वये सिडकोने बांधकाम मुदतवाढीकरिता देय असलेल्या अतिरिक्त भाडेपट्टा शुल्क वसुलीबाबत अभय योजना राबविण्यास तसेच इतर लोकाभिमुख धोरणात्मक निर्णय घेऊन मान्यता दिली होती. सदर अभय योजनेस महाराष्ट्र शासनाने 15 सप्टेंबर 2024 पर्यंत मुदतवाढ जाहीर केली आहे. सदर अभय योजनेस देण्यात आलेल्या मुदतवाढीनुसार, नवी मुंबई क्षेत्र तसेच नवीन शहरे प्रकल्पांतर्गत छत्रपती संभाजीनगर, नाशिक, नांदेड व नागपूर येथील सिडकोच्या प्रकल्पांसाठी अतिरिक्त भाडेपट्टा शुल्क (Additional Lease Premium) तसेच सेवा शुल्क (Service Charge) व विकास शुल्क (Development Charge) मध्ये 50% सवलत देण्यासंदर्भात राबविण्यात येणाऱ्या अभय योजनेंतर्गत अर्जदारास अर्ज करण्याकरिता 15 सप्टेंबर 2024 पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. अभय योजनेंतर्गत प्राप्त होणाऱ्या अर्ज/निवेदनांवर प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून पुढील 15 दिवसांत नियमोचित तपासणी करून, सिडकोमार्फत संबंधितांना रकमेचा भरणा करणेबाबत कळविण्यात येईल. सिडकोकडून याबाबत कळविण्यात आल्यानंतर पुढील 15 दिवसांच्या आत अर्जदाराने रकमेचा भरणा करणे आवश्यक असणार आहे. ज्या अर्जांवर भूखंडाचा क्रमांक नमूद केलेला असेल तेच अर्ज परिपूर्ण समजण्यात येतील. तसेच 15 सप्टेंबर 2024 नंतर प्राप्त होणाऱ्या अर्जांचा अभय योजने अंतर्गत विचार केला जाणार नाही.

CIDCO
WE MAKE CITIES

NEWS

दैनिक 'धनुषधारी' (उल्हासनगर-महा.) 21 अगस्त 2024

धनुषधारी

www.dailydhanushdhari.com

# सिडको के अतिरिक्त लीज, सेवा और विकास शुल्क के लिए जारी अभय योजना अब 15 सितंबर तक




नवी मुंबई (नि.सं.)। नवी मुंबई में सिडको भूखंडों पर निर्माण अवधि के विस्तार के लिए देय अतिरिक्त लीज शुल्क की वसूली के संबंध में लागू की गई अभय योजना को महाराष्ट्र सरकार के निर्णय के अनुसार 15 सितंबर, 2024 तक बढ़ा दिया गया है. इस संबंध में सूचित किए जाने के बाद अगले 15 दिनों के भीतर राशि का भुगतान करना होगा. केवल उन्हीं आवेदनों को पूर्ण माना जाएगा जिनमें प्लॉट नंबर अंकित है. साथ ही 15 सितंबर के बाद प्राप्त आवेदनों पर अभय योजना के तहत विचार नहीं किया जाएगा, ऐसी जानकारी सिडको की वरिष्ठ जनसंपर्क अधिकारी प्रिया रातांबे ने मंगलवार को दी।

बताते चलें कि, नवी मुंबई और आसपास के क्षेत्र में सिडको द्वारा लीज पर वितरित जमीन के विकास के संबंध में निर्माण व्यवसाय से संबंधित कठिनाइयों को ध्यान में रखते हुए महाराष्ट्र सरकार ने सिडको द्वारा देय अतिरिक्त लीज शुल्क की वसूली के संबंध में 12 जनवरी 2024 के आदेश के तहत निर्माण अवधि का विस्तार अभय योजना के क्रियान्वयन के साथ-साथ अन्य लोकाभिमुख नीतिगत निर्णयों को मंजूरी दी थी. इस अभय योजना को अब 15 सितंबर तक बढ़ाया गया है. अभय योजना को दिए गए विस्तार के अनुसार, आवेदक को नवी मुंबई क्षेत्र सहित नई शहर परियोजना छत्रपति संभाजीनगर, नासिक, नांदेड़ और नागपुर में सिडको परियोजनाओं के लिए अतिरिक्त लीज प्रीमियम के साथ-साथ सेवा शुल्क और विकास शुल्क में 50 प्रतिशत की छूट देने संबंध में अभय योजना के तहत आवेदन करने के लिए 15 सितंबर 2024 तक की मोहलत दी गई है. अभय योजना के अंतर्गत प्राप्त आवेदनों या विवरणों का नियमित निरीक्षण कर प्राप्ति तिथि से 15 दिवस के भीतर सिडको के माध्यम से संबंधित को राशि भुगतान की सूचना दी जायेगी।

@Cidco Ltd @cidco_Ltd @cidco_Ltd @CIDCO Ltd. cidco.maharashtra.gov.in

CIDCO
WE MAKE CITIES

NEWS

www.krushival.in
कृषीवल
बुधवार, दि. २१ ऑगस्ट, २०२४

# खारघर-सीबीडी कोस्टल रोडचा प्रश्‍न मार्गी

## प्रवाशांची होणार वाहतुक कोंडीतुन सुटका



। पनवेल । वार्ताहर ।

खारघर ते सीबीडी ३० मीटर रुंदीच्या कोस्टल रोड उभारणीला भारत सरकारच्या पर्यावरण, वन आणि हवामान बदल मंत्रालयने परवानगी दिली आहे. यामुळे ८ वर्षांपासून रखडलेल्या खारघर ते सीबीडी खाडीकिनारा कोस्टल रोडचा प्रश्न मार्गी लागणार आहे. तसेच, प्रवाशांची वाहतूक कोंडीतून सुटका होणार असून कळंबोली, कामोठे आणि खारघरवासियांना नवी मुंबई विमानतळ गाठणे सोयीचे होणार आहे.

सिडकोने नवी मुंबई प्रकल्प उभारण्याचा संकल्प हाती घेताना तळोजा, कळंबोली आणि खारघरवासियांना नवी मुंबई विमानतळ विना अडथळा जाता यावे यासाठी खारघर ते सीबीडी कोस्टल रोडसाठी २०१८ साली निविदा काढण्यात आली होती. या रस्त्याचे २७३ कोटींचे कंत्राट एका कंपनीला देण्यात आले होते. मात्र, या प्रकल्पाला पर्यावरण विभागाकडून परवानगीसाठी सिडकोकडून प्रयत्न सुरु होते. मात्र, त्याला यश मिळत नव्हते. अखेर ऑगस्ट महिन्याच्या पहिल्या आठवड्यात केंद्र सरकारच्या पर्यावरण, वन आणि हवामान बदल मंत्रालयाच्या तज्ञ मूल्यांकन समितीने कोस्टल रेग्युलेशन झोन नुसार खारघर ते सीबीडी-बेलापूर दरम्यान उभारल्या जाणाऱ्या कोस्टल रोडच्या बांधकामाला परवानगी दिली. यामुळे खारघर ते सीबीडी दरम्यान होणाऱ्या वाहतूक कोंडीतून प्रवाशांची सुटका होणार आहे.

पुणे-मुंबईकडे जाणाऱ्या नागरिकांना नवी मुंबई पामबीच आणि कोस्टल रोडने थेट खारघर टोल नाक्यावर पर्यंत विना अडथळा येता येणार आहे. खारघर ते सीबीडी सेक्टर-१५ खाडीकिनारा अंदाजे ६.९६ किलोमीटर अंतराचा कोस्टल रोड आहे. तळोजा-खारघर मधील नागरिकांना सीबीडी, सेक्टर-११ मार्गे नवी मुंबई विमानतळावर विना अडथळा जाता येणार आहे. खारघर-सीबीडी दरम्यान होणारी वाहतूक कोंडी सुटण्यास मदत होणार आहे. कोस्टल रोडमुळे खारघर कार्पोरेट पार्क, फुटबॉल स्टेडियमचा प्रवास सुखाचा होणार आहे. खारघर टोल नाका दरम्यान सायन-पनवेल महामार्गावर पुल उभारुन रस्ता केला जाणारा असल्यामुळे भविष्यात खारघर सेक्टर-१५, १६ ते १८ येथील घरांना अधिक मागणी असणार आहे.

@Cidco Ltd @cidco_Ltd @cidco_Ltd @CIDCO Ltd. cidco.maharashtra.gov.in

NEWS

Newsband Wednesday, 21 August 2024

# CIDCO seizes 35 unauthorized booster pumps in Kharghar

*Warns of action against housing societies*

By Chandrashekhar Hendve
@seashekhar

**Kharghar:** The City and Industrial Development Corporation (CIDCO) has intensified its crackdown on illegally installed booster pumps in housing societies across Kharghar. In a recent drive conducted by CIDCO's water supply department, 35 unauthorized booster pumps were seized from sectors 34 and 35 within the past week. CIDCO has issued a stern warning to housing societies in other nodes, including Taloja, Kamothe, Kalamboli, Panvel, Karanjade, Ulwe, and Dronagiri, to remove any illegally installed booster pumps or face legal action.



Despite the regular water supply in Kharghar and the cancellation of the 20% water cut by CIDCO from August 1, complaints about low-pressure water supply in certain sectors prompted an inspection by the water supply department. During this inspection, CIDCO officials discovered that some societies had installed unauthorized booster pumps to increase water pressure. As a result, these pumps were confiscated, and CIDCO has reiterated that legal action will be taken against any society found tam-

PAGE 11

## CIDCO SEIZES 35 UNAUTHORIZED...

CONTINUED FROM PAGE...1

pering with the water supply system.

Jitendra Gurkhe, an member from Keystone Society, expressed frustration over the ongoing water pressure issues in sectors 34 and 35. He claimed that despite repeated correspondence with CIDCO and meetings with officials, the problem remains unresolved. Gurkhe also alleged that while CIDCO removed booster pumps from some societies, it overlooked a particular high-rise tower where a 10 hp motor is being used to illegally draw water, suggesting that CIDCO officials residing in the area might be turning a blind eye.

CIDCO's Public Relation Officer, Priya Ratambe, confirmed the action taken against housing societies in Kharghar sectors 34 and 35. She also emphasized that if the unauthorized pumps are reinstalled, the societies will face legal consequences. Ratambe assured that similar campaigns would be conducted in other CIDCO nodes to ensure compliance with water supply regulations.

CIDCO's firm stance against unauthorized booster pumps underscores the importance of equitable water distribution and the need for societies to adhere to the rules to avoid disrupting the water supply system.

नवराष्ट्र | मुंबई, २१ ऑगस्ट २०२४

# सिडकोच्या अभय योजनेस मुदतवाढ

नवी मुंबई, (वा.) नवी मुंबईतील सिडकोच्या भूखंडांवर बांधकाम मुदतवाढीकरिता देय असलेल्या अतिरिक्त भाडेपट्टा शुल्क वसुलीबाबत राबविण्यात आलेल्या अभय योजनेस महाराष्ट्र शासनाच्या निर्णयानुसार १५ सप्टेंबर २०२४ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. नवी मुंबई व परिसरातील सिडकोने भाडेपट्ट्याने वितरित केलेल्या जमिनींच्या विकासनाच्या अनुषंगाने बांधकाम व्यवसायाशी संबंधित अडचणी लक्षात घेता महाराष्ट्र शासनाने १२ जानेवारी २०२४ रोजीच्या आदेशान्वये सिडकोने बांधकाम मुदतवाढीकरिता देय असलेल्या अतिरिक्त भाडेपट्टा शुल्क वसुलीबाबत अभय योजना राबविण्यास तसेच इतर लोकाभिमुख धोरणात्मक निर्णय घेऊन मान्यता दिली होती. सदर अभय योजनेस महाराष्ट्र शासनाने १५ सप्टेंबरपर्यंत मुदतवाढ जाहीर केली आहे.




सदर अभय योजनेस देण्यात आलेल्या मुदतवाढीनुसार, नवी मुंबई क्षेत्र तसेच नवीन शहरे प्रकल्पांतर्गत छत्रपती संभाजीनगर, नाशिक, नांदेड व नागपूर येथील सिडकोच्या प्रकल्पांसाठी अतिरिक्त भाडेपट्टा शुल्क तसेच सेवा शुल्क व विकास शुल्कात ५०% सवलत देण्यासंदर्भात राबविण्यात येणाऱ्या अभय योजनेंतर्गत अर्जदारास अर्ज करण्याकरिता १५ सप्टेंबरपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.

## १५ दिवसांच्या आत रकमेचा भरणा करणे आवश्यक

- अभय योजनेंतर्गत प्राप्त होणाऱ्या अर्ज/निवेदनांवर प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून पुढील १५ दिवसांत नियमोचित तपासणी करून, सिडकोमार्फत संबंधितांना रकमेचा भरणा करणेबाबत कळविण्यात येईल.
- सिडकोकडून याबाबत कळविण्यात आल्यानंतर पुढील १५ दिवसांच्या आत अर्जदाराने रकमेचा भरणा करणे आवश्यक असणार आहे.
- ज्या अर्जांवर भूखंडाचा क्रमांक नमूद केलेला असेल तेच अर्ज परिपूर्ण समजण्यात येतील.
- तसेच १५ सप्टेंबरनंतर प्राप्त होणाऱ्या अर्जांचा अभय योजनेअंतर्गत विचार केला जाणार नाही, याची अर्जदारांतर्फे नोंद घेण्यात यावी.




नवभारत मुंबई, बुधवार 21 अगस्त 2024

# सिडको की अभय योजना 15 तक बढ़ी

■ **नवी मुंबई,** (का. प्र.) नवी मुंबई में सिडको भूखंडों पर निर्माण अवधि के विस्तार के लिए देय अतिरिक्त लीज शुल्क की वसूली के संबंध में लागू की गई अभय योजना को 15 सितंबर तक बढ़ा दिया गया है. नवी मुंबई और उसके आसपास सिडको द्वारा पट्टे पर आवंटित भूमि के विकास के संबंध में निर्माण व्यवसाय से संबंधित कठिनाइयों को देखते हुए, महाराष्ट्र सरकार ने 12 जनवरी 2024 के आदेश द्वारा अभय योजना के कार्यान्वयन को मंजूरी दी थी. निर्माण अवधि के विस्तार और अन्य सार्वजनिक उन्मुख नीति निर्णयों के लिए सिडको द्वारा देय अतिरिक्त पट्टा शुल्क की वसूली के लिए अभय योजना को 15 सितंबर तक बढ़ाने की घोषणा की है.

## विकास शुल्क में 50 प्रतिशत की छूट

- अभय योजना को दिए गए विस्तार के अनुसार, आवेदक को नवी मुंबई क्षेत्र के तहत छत्रपति संभाजीनगर, नासिक, नांदेड़ और नागपुर में सिडको परियोजनाओं के लिए अतिरिक्त लीज प्रीमियम के साथ-साथ सेवा शुल्क और विकास शुल्क में 50 प्रतिशत की छूट दी जाएगी. रियायतें देने के सिलसिले में लागू की जा रही अभय योजना के तहत आवेदन करने के लिए 15 सितंबर तक की मोहलत दी गई है.
- अभय योजना के अंतर्गत प्राप्त आवेदनों का निरीक्षण कर प्राप्ति तिथि से 15 दिवस में सिडको के से संबंधित को राशि भुगतान की सूचना दी जायेगी. आवेदक को सिडको द्वारा इस बारे में सूचित किए जाने के बाद अगले 15 दिनों के भीतर राशि का भुगतान करना होगा. केवल उन्हीं आवेदनों को पूर्ण माना जाएगा, जिनमें प्लॉट नंबर अंकित है. साथ ही, 15 सितंबर 2024 के बाद प्राप्त आवेदनों पर अभय योजना के तहत विचार नहीं किया जाएगा.

CIDCO
WE MAKE CITIES
NEWS

अभेद्य प्रहार मंगळवार, २० ऑगस्ट ते २६ ऑगस्ट २०२४

# खारघरमधील अनधिकृत ३५ बुस्टर पंप जप्त

## सिडको पाणी पुरवठा विभागद्वारे कारवाई

पनवेल - खारघर सेक्टर-३४ आणि सेक्टर-३५ मधील गृहनिर्माण सोसायट्यांमध्ये जलवाहिनीवर बेकायदेशीरपणे लावलेले अनधिकृत बुस्टर पंप हटविण्याची मोहीम सिडको पाणी पुरवठा विभागाने सुरु केली असून, गेल्या आठवड्याभरात ३५ बुस्टर पंप जप्त करण्यात आले आहेत.

दरम्यान, सिडको अखत्यारीतील तळोजा, कामोठे, कळंबोली, पनवेल, करंजाडे, उलवे आणि द्रोणागिरी आदी नोडमधील गृहनिर्माण सोसायटींमध्ये अनधिकृतपणे लावण्यात आलेले बुस्टर पंप तात्काळ काढावे अन्यथा अनधिकृत बुस्टर पंप असलेल्या हौसिंग सोसायटींवर कारवाई केली जाईल, असा इशारा सिडको तर्फे देण्यात आला आहे. खारघर परिसरात नियमितपणे पाणी पुरवठा होत आहे. दरम्यान, १ ऑगस्ट पासून २० टक्के पाणी कपात सिडको पाणी पुरवठा विभागाने रद्द केली असूनही, काही सेक्टर मधील सोसायटींमध्ये कमी दाबाने पाणी पुरवठा होत असल्याच्या तक्रारी सिडकोकडे प्राप्त होताच सिडको पाणी पुरवठा विभागातील कर्मचाऱ्यांनी पाहणी केली असता खारघर सेक्टर-३४ आणि सेक्टर-३५ मधील गृहनिर्माण सोसायटींमध्ये सिडको जलवाहिनीवर बुस्टर पंप (मोटार) लावून पाणी घेत असल्याचे निदर्शनास येताच खारघर येथील काही सोसायटी मधील ३५ बुस्टर पंप 'सिडको'ने जप्त केले आहे.




दरम्यान, तळोजा, कामोठे, कळंबोली, पनवेल, करंजाडे, उलवे आणि द्रोणागिरी वसाहतीत सिडको जलवाहिनीवर बुस्टर पंप लावून पाणी घेत असल्यास बुस्टर पंप तात्काळ काढण्यात यावेत, असे आवाहन करतानाच 'बुस्टर पंपद्वारे पाणी घेणाऱ्या सोसायटींवर कायदेशीर कारवाई करण्यात येईल', अशी तंबी सिडको पाणी पुरवठा विभागातर्फे देण्यात आली आहे.

@Cidco Ltd @cidco_Ltd @cidco_Ltd @CIDCO Ltd. cidco.maharashtra.gov.in

CIDCO
WE MAKE CITIES

NEWS

बुधवार, २१ ऑगस्ट २०२४

# सिडकोच्या अभय योजनेस १५ सप्टेंबरपर्यंत मुदतवाढ

**नवी मुंबई : सिडको वृत्तसेवा**

नवी मुंबईतील सिडकोच्या भूखंडांवर बांधकाम मुदतवाढीकरिता देय असलेल्या अतिरिक्त भाडेपट्टा शुल्क वसुलीबाबत राबविण्यात आलेल्या अभय योजनेस महाराष्ट्र शासनाच्या निर्णयानुसार १५ सप्टेंबर २०२४पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.

नवी मुंबई व परिसरातील सिडकोने भाडेपट्ट्याने वितरीत केलेल्या जमिनींच्या विकासनाच्या अनुषंगाने बांधकाम व्यवसायाशी संबंधित अडचणी लक्षात घेता महाराष्ट्र शासनाने १२ जानेवारी २०२४ रोजीच्या आदेशान्वये सिडकोने बांधकाम मुदतवाढीकरिता देय असलेल्या अतिरिक्त भाडेपट्टा शुल्क वसुलीबाबत अभय योजना राबविण्यास तसेच इतर लोकाभिमुख धोरणात्मक निर्णय




घेऊन मान्यता दिली होती. सदर अभय योजनेस महाराष्ट्र शासनाने १५ सप्टेंबर २०२४ पर्यंत मुदतवाढ जाहीर केली आहे.

या अभय योजनेस देण्यात आलेल्या मुदतवाढीनुसार, नवी मुंबई क्षेत्र तसेच नवीन शहरे प्रकल्पांतर्गत छत्रपती संभाजीनगर, नाशिक, नांदेड व नागपूर येथील सिडकोच्या प्रकल्पांसाठी अतिरिक्त भाडेपट्टा शुल्क (Additional Lease Premium) तसेच सेवा शुल्क (Service Charge) व विकास शुल्क (Development Charge) मध्ये ५० टक्के सवलत देण्यासंदर्भात राबविण्यात येणाऱ्या अभय योजनेंतर्गत अर्जदारास अर्ज करण्याकरिता १५ सप्टेंबर २०२४पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.

अभय योजनेंतर्गत प्राप्त होणाऱ्या अर्ज/निवेदनांवर प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून पुढील १५ दिवसांत नियमोचित तपासणी करून, सिडकोमार्फत संबंधितांना रकमेचा भरणा करणेबाबत कळविण्यात येईल. सिडकोकडून याबाबत कळविण्यात आल्यानंतर पुढील १५ दिवसांच्या आत अर्जदाराने रकमेचा भरणा करणे आवश्यक असणार आहे.

ज्या अर्जांवर भूखंडाचा क्रमांक नमूद केलेला असेल तेच अर्ज परिपूर्ण समजण्यात येतील तसेच १५ सप्टेंबर २०२४ नंतर प्राप्त होणाऱ्या अर्जांचा अभय योजने अंतर्गत विचार केला जाणार नाही, याची कृपया अर्जदारांतर्फे नोंद घेण्यात यावी.

CIDCO
WE MAKE CITIES

NEWS

आपलं महानगर बुधवार २१ ऑगस्ट २०२४

# सिडकोच्या अभय योजनेला १५ सप्टेंबरपर्यंत मुदतवाढ

## नवी मुंबईसह ४ जिल्ह्यात अर्जदारांना सवलत

आपलं महानगर वृत्तसेवा

**नवी मुंबई।** सिडकोच्या भूखंडांवर बांधकाम मुदतवाढीकरीता देय असलेल्या अतिरिक्त भाडेपट्टा शुल्क वसुलीबाबत राबविण्यात आलेल्या अभय योजनेला महाराष्ट्र शासनाच्या निर्णयानुसार १५ सप्टेंबरपर्यंतची मुदतवाढ देण्यात आली आहे.

नवी मुंबई व परिसरातील सिडकोने भाडेपट्ट्यावर वितरीत केलेल्या जमिनींच्या विकासनाच्या अनुषंगाने बांधकाम व्यवसायाशी संबंधित अडचणी लक्षात घेता महाराष्ट्र शासनाने १२ जानेवारी २०२४ रोजीच्या आदेशान्वये सिडकोने बांधकाम मुदतवाढी करीता देय असलेल्या अतिरिक्त भाडेपट्टा शुल्क वसुलीबाबत अभय योजना राबविण्यास तसेच इतर लोकाभिमुख धोरणात्मक निर्णय घेऊन मान्यता दिली होती. अभय योजनेंतर्गत प्राप्त होणाऱ्या अर्ज, निवेदनांवर प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून पुढील १५ दिवसांत नियमोचित तपासणी करून, सिडकोमार्फत संबंधितांना रकमेचा भरणा करणेबाबत कळविण्यात येईल. सिडकोकडून याबाबत कळविण्यात आल्यानंतर पुढील १५ दिवसांच्या आत अर्जदाराने रकमेचा भरणा करणे आवश्यक असणार आहे. ज्या अर्जावर भूखंडाचा क्रमांक नमूद केलेला असेल तेच अर्ज परिपूर्ण समजण्यात येतील. तसेच १५ सप्टेंबर २०२४ नंतर प्राप्त होणाऱ्या अर्जदारांना या योजनेचा लाभ घेता येणार नाही, असे सिडकोने कळविले आहे.




### ५० टक्के सवलतीचा लाभ घेता येणार

सिडको प्राधिकरणाच्या अभय योजनेला देण्यात आलेल्या मुदतवाढीनुसार नवी मुंबई क्षेत्र तसेच नवीन शहरे प्रकल्पांतर्गत छत्रपती संभाजीनगर, नाशिक, नांदेड व नागपूर येथील सिडकोच्या प्रकल्पांसाठी अतिरिक्त भाडेपट्टा शुल्क तसेच सेवा शुल्क व विकास शुल्कमध्ये ५० टक्के सवलत देण्यासंदर्भात राबविण्यात येणाऱ्या अभय योजनेंतर्गत अर्जदाराला अर्ज करण्यासाठी १५ सप्टेंबरपर्यंत मुदतवाढ लागू असणार आहे.

CIDCO
WE MAKE CITIES
NEWS

पुढारी
मुंबई, बुधवार, २१ ऑगस्ट २०२४

# सिडकोची ९०२ सदनिकांच्या विक्रीसाठी योजना

**नवी मुंबई : पुढारी वृत्तसेवा**

सिडको कृष्ण जन्माष्टमीच्या मुहूर्तावर मंगळवार, दि. २७ ऑगस्ट रोजी एकूण ९०२ सदनिकांच्या गृहनिर्माण योजनेचा प्रारंभ करणार आहे. या गृहनिर्माण योजनेंतर्गत नवी मुंबईतील कळंबोली, खारघर व घणसोली या नोडमधील घरांचा समावेश असणार आहे.



आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटकाकरिता ३८ व सर्वसाधारण प्रवर्गासाठी १७५ याप्रमाणे एकूण २१३ सदनिका आणि सिडकोच्या खारघर येथील स्वप्नपूर्ती व वास्तूविहार-सेलिब्रेशन गृहसंकुलांतील मिळून एकूण ६८९ सदनिकांच्या विक्रीसाठी गृहनिर्माण योजना जाहीर करण्यात येणार आहे.

सिडको सातत्याने विविध उत्पन्न गटांतील नागरिकांसाठी गृहनिर्माण योजना राबविते. या वर्षीच्या कृष्ण जन्माष्टमीच्या मुहूर्तावर जाहीर करण्यात येणाऱ्या गृहनिर्माण योजनेद्वारे नागरिकांना सर्व पायाभूत सोयी सुविधांनी परिपूर्ण असलेल्या नवी मुंबईमध्ये आपले हक्काच्या घराचे स्वप्न साकार करण्याची संधी मिळणार आहे. या गृहसंकुलांना रेल्वे, रस्ते, मेट्रो द्वारे कनेक्टिव्हिटी लाभली आहे. सिडकोच्या नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळासह सिडकोचे अन्य महत्त्वाकांक्षी प्रकल्प या गृहसंकुलांपासून नजीकच्या अंतरावर आहेत. यामुळे नागरिकांना परिपूर्ण जीवनशैली अनुभवण्याची संधी मिळणार आहे.

@Cidco Ltd @cidco_Ltd @cidco_Ltd @CIDCO Ltd. cidco.maharashtra.gov.in

महाराष्ट्र टाइम्स । मुंबई । बुधवार, २१ ऑगस्ट २०२४

# सिडकोची अभय योजना १५ सप्टेंबरपर्यंत

म. टा. वृत्तसेवा, नवी मुंबई



## थकीत चार हजार कोटी रुपये वसुलीचे उद्दिष्ट

भाडेपट्टा शुल्क, सेवाशुल्क व विकास शुल्कामध्ये ५० टक्के सवलत देण्यासंदर्भात सिडकोद्वारा राबवण्यात येणाऱ्या अभय योजनेला अखेर राज्य सरकारने येत्या १५ सप्टेंबरपर्यंत मुदतवाढ दिली आहे. भाडेपट्टा, सेवा व विकास शुल्कासह मावेजा रक्कमेपोटी सिडकोची चार हजार कोटी रुपये रक्कम थकीत आहे. विशेष म्हणजे ही अभय योजना नवी मुंबई प्रकल्पासह शहरे प्रकल्पांतर्गत छत्रपती संभाजी नगर, नाशिक, नांदेड व नागपूर येथील सिडकोच्या प्रकल्पांसाठीही नगर विकास विभागाने लागू केली आहे.

सिडकोच्या थकीत रकमेच्या वसुलीसाठी राज्य सरकारने या रकमेवर ५० टक्के सवलत लागू करून अभय योजनेला ३० जूनपर्यंत मुदतवाढ दिली होती. मात्र त्यानंतर राज्य सरकारने अभय योजनेला मुदतवाढ देण्याबाबत निर्णय न घेतल्याने नवी मुंबईकर हवालदिल झाले होते. विकासकांच्या विविध संघटनांनी व लोकप्रतिनिधींनी केलेल्या मागणीनंतर सिडकोने लागू केलेल्या अभय योजनेला अखेर नगर विकास विभागाने १५ सप्टेंबरपर्यंत मुदतवाढ देण्याचा निर्णय घेतला आहे. याबाबतचा निर्णय नगर विकास विभागाने १९ ऑगस्ट रोजी जाहीर केला आहे.

अभय योजनेला मुदतवाढ देताना नगर विकास विभागाने येत्या १५ सप्टेंबरपर्यंत सिडकोला प्राप्त होणाऱ्या अर्जांवर सिडको अधिकाऱ्यांनी पुढील १५ दिवसांत अर्जांची तपासणी करून अर्जदारास थकीत रकमेचा भरणा पुढील १५ दिवसांत करण्याबाबत कळविण्यास सांगितले आहे. सिडकोने कळविल्यानंतरच्या १५ दिवसांत संबंधितांनी थकीत रकमेचा भरणा सिडकोत करणे बंधनकारक राहणार आहे. तसेच, अर्जावर भूखंडाचा क्रमांक नमूद केलेला असल्यावर अर्ज परिपूर्ण समजण्यात येणार असल्याचे नगर विकास विभागाने पत्रात स्पष्ट केले आहे.

३० जूननंतर सिडकोच्या अभय योजनेला मुदतवाढ देण्याबाबत सरकारकडून निर्णय घेतला जात नसल्याने अतिरिक्त भाडेपट्टा शुल्क, सेवा शुल्क, विकास शुल्क व मावेजाच्या थकीत चार हजार कोटी रुपये वसुलीचा प्रश्न सिडकोपुढे उभा ठाकला होता. तर नवी मुंबईकर नागरिकही संभ्रमात होते.

CIDCO
WE MAKE CITIES

NEWS

पुण्य नगरी
मुंबई विभाग । बुधवार, २१ ऑगस्ट २०२४

# अभय योजनेला १५ सप्टेंबरपर्यंत मुदतवाढ

## थकीत ४ हजार कोटी रुपये वसुलीचे सिडकोपुढे उद्दिष्ट

**। नवी मुंबई :** भाडेपट्टा शुल्क, सेवाशुल्क व विकास शुल्कमध्ये ५० टक्के सवलत देण्यासंदर्भात सिडकोद्वारा राबवण्यात येणाऱ्या अभय योजनेला अखेर शासनाने येत्या १५ सप्टेंबरपर्यंत मुदतवाढ दिली आहे. भाडेपट्टा, सेवा व विकास शुल्कासह मावेजा रकमेपोटी सिडकोची ४००० कोटी रुपये रक्कम थकीत आहेत. विशेष म्हणजे अभय योजना ही नवी मुंबई प्रकल्पासह शहरे प्रकल्पांतर्गत छत्रपती संभाजी नगर, नाशिक, नांदेड व नागपूर येथील सिडकोच्या प्रकल्पांसाठी देखील नगर विकास विभागाने लागू केली आहे.

सिडकोच्या या थकीत रकमेच्या वसुलीसाठी राज्य सरकारने थकीत रकमेवर ५० टक्के सवलत लागू करून अभय योजनेला ३० जूनपर्यंत मुदतवाढ दिली होती. मात्र, त्यानंतर राज्य सरकारने अभय योजनेला मुदतवाढ देण्याबाबत निर्णय न घेतल्याने नवी मुंबईकर नागरिक हवालदिल झाले होते. विकासकांच्या विविध संघटनांनी व लोकप्रतिनिधींनी केलेल्या मागणीनंतर सिडकोने लागू केलेल्या अभय योजनेला अखेर नगर विकास विभागाने १५ सप्टेंबरपर्यंत मुदतवाढ देण्याचा निर्णय घेतला आहे. याबाबतचा निर्णय नगर विकास विभागाने १९ ऑगस्ट रोजी जाहीर केला आहे.




अभय योजनेला मुदतवाढ देताना नगर विकास विभागाने येत्या १५ सप्टेंबरपर्यंत सिडकोला प्राप्त होणाऱ्या अर्जांवर सिडको अधिकाऱ्यांनी पुढील पंधरा दिवसांत अर्जांची नियमोचित तपासणी करून अर्जदारास थकीत रकमेचा भरणा पुढील पंधरा दिवसात करणेबाबत कळवण्यास सांगितले आहे. सिडकोने कळवल्यानंतर या पंधरा दिवसांत संबंधितांनी थकीत रकमेचा भरणा सिडकोत करणे बंधनकारक राहणार आहे. तसेच अर्जावर भूखंडाचा क्रमांक नमूद केलेला असला तरच अर्ज परिपूर्ण समजण्यात येणार असल्याचे नगर विकास विभागाने आपल्या पत्रात स्पष्ट केले आहे.